मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भारतमातानगर दिघी ते भोसरी-आळंदी रस्ता 'सुपरफास्ट'

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार



**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणार्या भारमातानगर दिघी ते भोसरी-आळंदी रस्त्याच्या काँक्रीटीकरणच्या कामाला अखेर मुहूर्त मिळाला आहे. दिघी ग्रामस्थांच्या मागणीनंतर भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिकेच्या संबंधित अधिकार्यांना सूचना दिल्या. त्यानुसार या कामाचे भूमीपूजन करण्यात आले आहे. २०१९ मध्ये जागामालक प्रशासन यांच्यातील विसंवादावर तोडगा काढून कच्चा रस्ता उपलब्ध झाला होता. आता काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण करुन 'सुपरफास्ट' रस्ता कार्यान्वयीत करण्यात येणार आहे.यावेळी ह.भ.प. दत्ता गायकवाड, माजी नगरसेविका निर्मला गायकवाड, माजी नगरसेविका आशा सुपे, मीना पाटील, माजी नगरसेवक सागर गवळी, विकास डोळस, कुलदीप परांडे, संजय गायकवाड, चेतन घुले, माजी सैनिक संघाचे अध्यक्ष नरेंद्रसिंग चौव्हान, आमसिध्द भीसे, धनवे, पनवर, किशोर नवले उपस्थित होते.

भारमातानगर दिघी ते भोसरी आळंदी रस्त्याची दुरवस्था झाली होती. रस्त्यात खड्डे पडले होते. पावसाळ्यात पाणी साचून राहत होते. परिणामी वाहनधारकांना त्यामधून मार्ग काढताना जिकिरीचे होत असे. रस्ता काँक्रीटीकरण करणे गरजेचे असल्याचे सातत्याने नागरिकांचे म्हणणे होते. त्यानुसार आमदार महेश लांडगे यांच्याकडे परिसरातील नागरिकांनी तक्रारींचे गार्हाणे मांडले. आमदार लांडगे यांनी आमदार निधीतून हे काम हाती घेतले आहे. भारतमातानगर दिघी ते भोसरी आळंदी रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामाचे भुमिपूजन करण्यात आले आहे.

### स्थानिक नागरिकांनी मानले आभार

» रस्ता तयार करण्यासाठी सहकार्य करणार्या पांडुरंग वाळके, विकास वाळके, प्रसन्न वाळके, काळुराम वाळके यांच्या व मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. या वेळी परिसरातील नागरिक उपस्थित होते. प्रलंबित रस्त्याच्या कामाला गती मिळाल्याने भारतमातानगर येथील नागरिकांच्या वतीने आमदार महेश लांडगे यांचे आभार मानण्यात आले आहेत.

"दिघी जोडणाऱ्या पर्यायी रस्त्यांचा विकास करण्यासाठी आम्ही 'व्हीजन-२०२०' अंतर्गत पुढाकार घेतला होता. भोसरी-आळंदी रस्त्याला जोडणाऱ्या या रस्त्याची दुरवस्था झाली होती. त्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना नाहक मन:स्ताप सहन करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम हाती घेतले आहे. डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात काम पूर्ण करुन रस्ता सेवेत दाखल होईल.

**- महेश लांडगे,** आमदार,
भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# प्रतिभा महाविद्यालय, प्लेसमेंट सेलच्यावतीने ९ कंपन्यांशी करार

## पदवी घेताच रोजगार उपलब्ध व्हावा

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।**

चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा महाविद्यालयातील प्रतिभा फिनिशिंग स्कूल व प्लेसमेंट सेल या विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्याच्यात कुशलता निर्माण करणे, अनुभव मिळावे. पदवी घेताच रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी नऊ प्रशिक्षण देणार्या संस्था व कंपन्यांसमवेत सामंजस्य करार लिखित स्वरूपात करण्यात आला.

संस्थेचे संस्थापक डॉ. दिपक शहा यांनी लिखीत स्वरूपात सामंजस्य करार करून त्याचा यथोचित गौरव करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांसमवेत संस्थेच्या प्रभारी प्राचार्या डॉ. क्षितीजा गांधी, एम.बी.ए. विभागाचे संचालक डॉ. सचिन बोरगावे, मुख्य प्रशासकिय अधिकारी डॉ. राजेंद्र कांकरीया, विभाग प्रमुख प्रा. गुरूराज डांगरे, डॉ. जयश्री मुळे, प्रा. मनीष पाटणकर, प्रशिक्षण व प्लेसमेंट प्रमुख डॉ. हर्षिता वाच्छानी, सहाय्यक शंकर जाधव यांच्या उपस्थितीत सामंजस्य कराराचे अदान-प्रदान करण्यात आले.

टेक्क्यू इन्फोटेक प्रा.लि.-अर्जुन वडगावे, प्रथम फाऊंडेशन-केतन साठे, पोर्टल विंझ सोल्युशन-श्रेयश कुलकर्णी, आयुष सर्व्हिसेस-अरूण वासंगकर, पी.एस. पी.आय.पी. असोसिएट्स प्रा.लि.-ॲड. सुर्यकांत पाटील, आर.एस.एल.प्रा.लि.-रूपेश मुनोत, इन्पीव्हरीटाज-अरूण मोरे, स्कील ॲकॅडमी-महेश कोल्हे विविध प्रशिक्षण देणार्या संस्थांचे प्रमुख व कंपन्यांच्या अधिकार्यांसमवेत सामंजस्य करार करण्यात आला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपक शहा मनोगतात म्हणाले की, विविध शाखेत विद्यार्थी शिक्षण घेत असतानाच त्यांना त्याच्या आवडत्या क्षेत्रातील शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देवून त्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणवत्तेला वाव मिळावा, त्याचबरोबर पदवीग्रहण करताना विद्यार्थी एक परिपूर्ण संस्थेतून बाहेर पडावा, यासाठी विविध शाखेत शिक्षण घेत असलेला प्रत्येक विद्यार्थी केंद्रबिंदू ठेवत विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, औद्योगिक आदी क्षेत्रातील कामांचा प्रत्यक्ष अनुभव तज्ञाकरवी प्रशिक्षण स्वरूपात देण्याचा मुख्य उद्देश आहे.यासाठी आज नऊ विविध प्रशिक्षण देणारे संस्था, कंपन्यांनी पुढाकार घेतला याचा मनस्वी आनंद होत आहे. गेली काही वर्षे संस्थेतील होतकरू विद्यार्थ्यांना २० ते ५० हजार रूपये भांडवली स्वरूपात आर्थिक मदत करून विद्यार्थ्यांच्या सुप्त इच्छाशक्तींना प्रत्यक्ष कृतीरूपी त्यांचे व्यावसायिक होण्याचे स्वप्न ही साकार केले आहे.

# मराठा समाजाला आरक्षण आणि मुलाला नोकरी मिळत नसल्याने आळंदीत वृद्धाची आत्महत्या!

## प्रशासन आम्हाला न्याय देत नाही याच नैराश्यातून आत्महत्या

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

मराठा समाजाला आरक्षण व मुलाला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळत नसल्याने नैराश्यातून व्यंकट ढोपरे (वय ६०) या वृद्धाने टोकाचे पाऊल उचलले आहे. आळंदीमधील इंद्रायणी नदीत ढोपरे यांचा आज मृतदेह आढळला. नऱ्हे आंबेगाव येथून काल ते दर्शनासाठी आळंदीत आले होते. सकाळी अकराच्या सुमारास ते तिथून निघाले अन कुटुंबियांना घरातच एक चिठ्ठी सापडली. त्यात मराठा समाजाला आरक्षण मिळत नाही, मी सरपंच असल्यापासून प्रयत्न करतो, तरी सरकार याला गांभीर्याने घेत नाही. तसेच २०१२ पासून माझ्या मुलाला अनुकंपावर नोकरी दिली जात नाही. मुलाच्या आईच्या वडिलांच्या जागी त्याला नोकरी मिळावी म्हणून आम्ही प्रयत्न करतोय. पण प्रशासन आम्हाला न्याय देत नाही, याच नैराश्यातून मी आत्महत्या करीत आहे, असा आशय त्या चिठ्ठीत होता. घरात चिठ्ठी सापडल्यानंतर कुटुंबियांनी भोसरी येथे राहणाऱ्या जावयास चिठ्ठीबाबत कळवले. तेव्हा आळंदीत त्यांचा शोध घेताना बंधाऱ्यालगत ढोपरे यांची पिशवी, मोबाईल, गळ्यातील माळ, चप्पल अन ज्ञानेश्वरीमधील काही कागदं आढळली. त्याच बंधाऱ्यात पोलीस आणि एनडीआरएफकडून शोध सुरू झाला. आज दुपारी बंधाऱ्यालगतच ढोपरे यांचा मृतदेह आढळला. त्यांना पोहता येत असल्याने त्यांनी स्वतः:च स्वतः:चे हात बांधून इंद्रायणी नदीत उडी घेतली असेल, असा पोलिसांना संशय आहे. शवविच्छेदन अहवालातून आणखी माहिती समोर येईल, असे पोलिसांनी म्हटले आहे.



### इंद्रायणी नदीपात्रात घेतली उडी

» तीर्थक्षेत्र आळंदी येथे काल शुक्रवारी व्यंकट ढोपरे पुण्याच्या नऱ्हे आंबेगाव भागातून माऊलीच्या दर्शनासाठी आले होते. दर्शन घेतल्यानंतर रात्री आठ वाजेच्या सुमारास त्यांनी इंद्रायणी पात्रात उडी मारत आत्महत्या केली. उडी मारल्यानंतर तत्काळ काही वेळानंतर स्थानिकांनी आळंदी पोलीस ठाण्यात माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच आळंदी पोलीस पथक, अग्निशमन दलाचे कर्मचारी घटनास्थळी पोहोचले. रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध घेण्यात आला. मात्र अंधार असल्याकारणानं रात्री अकरा वाजता शोधकार्य थांबविण्यात आलं. त्यानंतर आज सकाळी पुन्हा शोध कार्य सुरू करण्यात आलं. शोध मोहीम सुरू असताना सकाळी अकरा वाजेच्या सुमारास त्यांचा मृतदेह इंद्रायणी नदीमध्ये आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी मृतदेह बाहेर काढला.

# मोशीत सकल मराठा समाजाकडून मशाल मोर्चा

## आरक्षण मिळेपर्यंत आजपासून साखळी उपोषण

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्सप्रेस मराठी।**

राज्यात अनेक ठिकाणी नेत्यांना बंदी, तर काही ठिकाणी मोर्चा काढून मराठा आरक्षणासाठी बसलेल्या जरांगे पाटील यांना पाठींबा दिला जात आहे. मोशीत शनिवारी सकल मराठा क्राती मोर्चातर्फे मशाल मोर्चा काढून पाठींबा देण्यात आला.

यावेळी सकल मराठा समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. नागेश्वर महाराज मंदिरापासून मोर्चाला सुरुवात करून, आळंदी रोड कदून मोर्चा निघून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापाशी मोर्चा संपन्न झाला. यावेळी समाज बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग दर्शविला. यावेळी घोषणा देऊन आरक्षणासाठी आपल्या न्याय हक्काच्या मागण्या या ठिकाणी मांडल्या. यावेळी सकल मराठा समाज मोशी यांच्या वतीने गुणरत्न सदावर्ते याचा जाहीर निषेध करण्यात आला व आज पर्यंत जेवढा मराठा समाजाच्या बांधवांनी आरक्षणासाठी बलिदान दिलं त्या सर्वांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सकल मराठा क्रांती मोर्चा मोशी तर्फे रविवारी (२९) बेमुदत सकाळी उपोषण करण्यात येणार आहे. जोपर्यंत मराठा समाजाला आरक्षण मिळणार नाही तोपर्यंत उद्यापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक गोडाऊन चौक या ठिकाणी समाजाच्या वतीने उपोषणाला सुरुवात करण्यात येणार आहे.



# मराठा समाजाच्या आंदोलनाचा धसका!

## माळेगाव सहकारी कारखान्याच्या कार्यक्रमापासून अजित पवार दूरच



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मराठा समाजाच्या आंदोलनाचा धसका घेत कायदा आणि सुव्यवस्थेवर ताण पडू नये म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या गळीत हंगामाच्या शुभारंभ कार्यक्रमापासून दूर राहणे पसंत केले. ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाची सुरुवात करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार येणार नसल्याचे कारखाना प्रशासनाकडून सांगण्यात आले. आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाच्या वतीने राज्यभरात सर्वत्र निदर्शने सुरू आहेत. त्याचा एक भाग म्हणून राजकीय नेत्यांना काळे झेंडे दाखविण्याचे आंदोलन केले जात आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या गाळप हंगामाची सुरुवात अजित पवार हस्ते ऊसाची मोळी टाकून करण्यात येणार असल्याचे जाहीर होताच अजित पवार यांना बारामती बंदी करण्याचा इशारा देण्यात आला होता. कारखान्याच्या कार्यक्रमासाठी अजित पवार यांच्या उपस्थितीला मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने विरोध करण्यात आला होता. हे ध्यानात घेऊन अजित पवार यांनी कार्यक्रमाला येण्याचे टाळले असल्याचे दिसून येत आहे. मात्र, मराठा क्रांती मोर्चाचे कार्यकर्ते कार्यक्रमाच्या ठिकाणी ठिय्या देऊन बसले होते. अजित पवार येणार नसल्याचे कारखाना प्रशासनाकडून अधिकृतरीत्या सांगितले जात नाही तोपर्यंत कार्यकर्ते जाणार नसल्याचे मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्यावर चोख पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवल्याने कारखाना परिसरात पोलीस छावणीचे स्वरूप आले होते.

### राज्यभरात सर्वत्र निदर्शने

» गळीत हंगामाची सुरुवात करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार येणार नसल्याचे कारखाना प्रशासनाकडून सांगण्यात आले. आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा समाजाच्या वतीने राज्यभरात सर्वत्र निदर्शने सुरू आहेत. त्याचा एक भाग म्हणून राजकीय नेत्यांना काळे झेंडे दाखविण्याचे आंदोलन केले जात आहे. माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या गाळप हंगामाची सुरुवात अजित पवार हस्ते ऊसाची मोळी टाकून करण्यात येणार असल्याचे जाहीर होताच अजित पवार यांना बारामती बंदी करण्याचा इशारा देण्यात आला होता. कारखान्याच्या कार्यक्रमासाठी अजित पवार यांच्या उपस्थितीला मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने विरोध करण्यात आला होता.

# पुणे : मेट्रो स्थानकांच्या उभारणीत त्रुटी!

## मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न उपस्थित



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** मेट्रो स्थानकांच्या उभारणीतील त्रुटी काही ज्येष्ठ अभियंत्यांनी समोर आणल्या होत्या. यामुळे मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या मुद्यावरून शुक्रवारी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांची झाडाझडती घेतली. त्यावेळी महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी काही त्रुटी असल्याची कबुली देत दुरुस्ती सुरू असल्याचे सांगितले. दानवे यांनी महामेट्रोच्या कार्यालयाला भेट देऊन मेट्रो प्रकल्पाचा आढावा घेतला. या वेळी महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे उपस्थित होते. या शिवसेनेचे (ठाकरे गट) माजी आमदार चंद्रकांत मोकाटे यांच्यासह इतर नेतेही बैठकीला उपस्थित होते. या वेळी दानवे यांनी पुण्यातील काही ज्येष्ठ अभियंत्यांनी मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचा उल्लेख केला. मेट्रोची सुरक्षितता ही जनतेच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाची असून, त्यात त्रुटी आहेत का, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी कामात काही त्रुटी असल्याची कबुली दिली. या त्रुटी सामान्य असून, त्या दूर करण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करणारे सर्व तज्ज्ञ व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर महामेट्रोने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा दानवे यांनी व्यक्त केली. तांत्रिक कारणामुळे मेट्रो बंद पडत असल्याचाही मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. या घटना आठवड्यातून एखाद्या वेळी घडत असून, त्यावर उपाययोजना केल्या जात आहेत, असे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. मेट्रोच्या स्थानकांना महापुरुषांची नावे देण्यात यावी, अशी मागणी दानवे यांनी केली. याचबरोबर शिवाजीनगर स्थानकाचे नाव छत्रपती शिवाजीनगर आणि रूबी हॉल स्थानकाचे नाव माता रमाबाई आंबेडकर स्थानक करावे, अशी सूचना त्यांनी केली. यावर महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी राज्य सरकारला प्रस्ताव पाठविण्यात येईल, असे सांगितले. मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत आम्ही उपस्थित केलेल्या प्रश्नांना महामेट्रोने थातूरमातूर उत्तरे दिली आहेत. त्यांनी आमच्या मुख्य प्रश्नांना बगल दिली आहे. आम्ही अतिशय गंभीर त्रुटी मांडल्या होत्या. त्यांनी आता केलेले दुरुस्तीचे काम अतिशय वरवरचे आहे. त्यांच्याकडून त्रुटी लपविण्याचा प्रयत्न सुरू आहे, असे हैदराबाद मेट्रोचे माजी व्यवस्थापकीय संचालक विवेक गाडगीळ यांनी म्हटले आहे.

### अधिकाऱ्यांची कबुली

» महामेट्रोचे कार्यकारी संचालक हेमंत सोनावणे यांनी कामात काही त्रुटी असल्याची कबुली दिली. या त्रुटी सामान्य असून, त्या दूर करण्याचे काम सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले. मेट्रोच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित करणारे सर्व तज्ज्ञ व्यक्ती आहेत. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्यावर महामेट्रोने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा दानवे यांनी व्यक्त केली. तांत्रिक कारणामुळे मेट्रो बंद पडत असल्याचाही मुद्दा बैठकीत उपस्थित करण्यात आला. या घटना आठवड्यातून एखाद्या वेळी घडत असून, त्यावर उपाययोजना केल्या जात आहेत, असे

# ससून रुग्णालयातील दोषी कोण?

## चौकशी समितीकडून अखेर अहवाल सादर

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** ससून रुग्णालयातील कैदी पलायनप्रकरणी चौकशीसाठी नेमलेल्या समितीने अखेर आपला अहवाल शुक्रवारी सादर केला. समितीने वैद्यकीय शिक्षण आयुक्त राजीव निवतकर यांच्याकडे हा अहवाल दिला आहे. त्यांच्याकडून हा अहवाल वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांकडे पाठविला जाणार आहे. दरम्यान, हे सचिव परदेश दौऱ्यावर असल्याने ३ नोव्हेंबरला हा अहवाल त्यांच्यासमोर सादर होईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. ससून रुग्णालयातून अमली पदार्थ तस्करी प्रकरणाचा सूत्रधार ललित पाटील याने पलायन केल्याप्रकरणी राज्य सरकारने चार जणांची चौकशी समिती ११ ऑक्टोबरला नियुक्त केली होती.




या समितीच्या अध्यक्षपदी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. दिलीप म्हैसेकर, तर सदस्यपदी सोलापूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, नांदेडमधील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. हेमंत गोडबोले आणि मुंबईतील ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अस्थि व्यंगोपचार विभागाचे प्रमुख डॉ. एकनाथ पवार हे होते. ही समिती १५ दिवसांत चौकशी करून सरकारला अहवाल सादर करणार होती. समितीने १५ दिवस संपताच तातडीने आपला अहवाल शुक्रवारी वैद्यकीय शिक्षण आयुक्त निवतकर यांना सादर केला. हा अहवाल निवतकर यांच्याकडून वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांकडे पाठवला जाणार आहे. सध्या सचिव परदेश दौऱ्यावर आहेत. ते परतल्यानंतर ३ नोव्हेंबरला हा अहवाल त्यांच्यासमोर ठेवला जाईल. त्यानंतर राज्य सरकार या अहवालावर कार्यवाही करेल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

ससूनप्रकरणी चौकशी समितीचा अहवाल वैद्यकीय शिक्षण आयुक्तांकडे सादर करण्यात आला आहे. हा अहवाल गोपनीय असल्याने त्यातील तपशील जाहीर करता येणार नाही. राज्य सरकारकडून या अहवालावर कार्यवाही केली जाईल, असे ससून चौकशी समितीचे अध्यक्ष डॉ. दिलीप म्हैसेकर यांनी म्हटले आहे.

### ससूनच्या चौकशीचा फेरा

- ८० जणांची चौकशी
- अधिष्ठाता, वैद्यकीय अधीक्षककडून लेखी जबाब
- २०२० पासून कैदी रुग्णांच्या अहवालांची तपासणी
- उपचार करणाऱ्या डॉक्टरांकडे संशयाची सुई
- ललित पाटीलवर अधिष्ठाताकडून उपचार

# पुणे जिल्ह्यातील मतदार संख्या ८० लाख ७३ हजार!

## जिल्हा निवडणूक शाखेने प्रारूप मतदारयादी जाहीर केली

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जिल्हा निवडणूक शाखेने शुक्रवारी (२७ ऑक्टोबर) प्रारूप मतदारयादी जाहीर केली. त्यानुसार शहरातील आठ, पिंपरी-चिंचवडमधील तीन, तर ग्रामीण भागातील दहा अशा एकूण २१ विधानसभा मतदार संघांमधील मतदारांची संख्या ८० लाख ७३ हजार १८३ झाली आहे. चालू वर्षी ५ जानेवारीला जाहीर करण्यात आलेल्या अंतिम मतदारयादीपेक्षा मतदारांच्या संख्येत एक लाख २१ हजार ७६३ ने वाढ झाली आहे. या यादीवर नागरिकांना ९ डिसेंबरपर्यंत दावे, हरकती दाखल करता येणार आहेत.



निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार १ जानेवारी २०२४ पर्यंत किंवा त्या आधी १८ वर्षे पूर्ण झालेल्या नागरिकांची मतदार नोंदणी करण्यात येत आहे. प्रारूप यादीवरील दावे, हरकती निकाली काढल्यानंतर ५ जानेवारी २०२४ रोजी शहरासह जिल्ह्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या यादीत नाव असणाऱ्या नागरिकांनाच लोकसभेला मतदार करता येणार आहे.

गेल्या वर्षी जिल्ह्यातील १८ ते १९ या वयोगटातील मतदारांची संख्या ७९ हजार ३६२ एवढी होती. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ही टक्केवारी ०.६७ टक्के होती. यंदा या वयोगटातील मतदारांची संख्या तीन लाख ७१ हजार तीन एवढी झाली आहे. एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ती ३.१३ टक्के आहे, तर २०- २९ या वयोगटातील मतदारांची संख्या १३ लाख ६३ हजार ६२४ वरून २८ लाख २७ हजार ३७६ एवढी झाली आहे. या वयोगटातील मतदारांच्या टक्केवारी ११.५१ वरून २३.८६ टक्क्यांपर्यंत वाढली आहे. त्यामुळे युवक मतदारांच्या टक्केवारीत वाढ झाल्याचे निरीक्षण उपजिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर यांनी नोंदविले.

प्रारूप मतदार यादी नागरिकांना पाहण्यासाठी सर्व मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांना आपले नाव मतदार यादीमध्ये आहे किंवा कसे, संकेतस्थळावर पाहता येणार आहे, असे उपजिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी मीनल कळसकर यांनी सांगितले.

२१ विधानसभा मतदार संघातील मतदार संख्या ७९ लाख ५१ हजार ४२० प्रारूप यादीतील मतदार संख्या ८० लाख ७३ हजार १८३ पुरुष मतदारांची संख्या ४२ लाख २५ हजार ९१८

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा पुरुष मतदारांमध्ये ५९ हजार ६५३ ने वाढ

महिला मतदारांची संख्या ३८ लाख ४६ हजार ७४१तृतीयपंथी मतदारांची संख्या ४९५ वरून ५२४.